10 JAN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून आजअखेर ४५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर- नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ४५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. शुक्रवारी एमबीए, बीएड, बीएस्सी, एमकॉम, एमबीए (एकात्मिक) आदी १५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध २६ केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला ३ हजार ८१४ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ९ रोजी एलएलएम, इतिहास, बीजे., एमएस्सी (नॅनो सायन्स), एमएस्सी (झूलॉजी) आदी १३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.



परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

10 JAN 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ४५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी विविध १५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा २६ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी ३ हजार ८१४ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात १३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले असून, एकूण ४५७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

10 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉमर्स कॉलेजने पटकावले सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेत धडक कामगिरी : महावीर कॉलेज उपविजेता अनिकेत नलवडेची उत्कृष्ट फलंदाजी, क्षितीज पाटीलची अष्टपैलू खेळी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट पुरुष स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कॉमर्स कॉलेजाने महावीर कॉलेजचा ५८ धावांनी पराभव करत अजिंक्यपद पटकावले. या अजिंक्यपदाच्या रुपाने कॉमर्स कॉलेजच्या नावावर सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद पडले आहे. या अजिंक्यपदासाठी अनिकेत नलवडे व क्षितीज पाटील या भरवशाच्या फलंदाजांनी केलेली धुव्वाधार फलंदाजी महत्त्वपूर्ण ठरली आहे. शिवाजी विद्यापीठातील क्रिकेट मैदानात हा अंतिम सामना झाला.

कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट पुरुष स्पर्धेवर नेहमीच कॉमर्स कॉलेज व महावीर कॉलेजचे वर्चस्व राहिले आहे. शिवाय स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी आमने-सामने आलेले हेच दोन्ही संघ फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्हीही पातळीवर अतिशय तुल्यबळ होते. सामन्यासाठी केलेला टॉस जिंकून कॉमर्स कॉलेजने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार या संघाने २० षटकात ५ बाद २०३ धावांचे आव्हान महावीर कॉलेजसमोर उभा केले. कॉमर्सची धावसंख्या भक्कम करण्यासाठी अनिकेत नलवडेने धुव्वाधार फलंदाजी करत ३६ चेंडूत ९० तर क्षितिज पाटीलने ४२ धावांचे योगदान दिले. गोलंदाजी करताना महावीर कॉलेजच्या अभिषेक आमरेने २ बळी तर वरद माळी आणि साई मानेने प्रत्येकी १ बळी घेतला.



शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट पुरुष स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवलेल्या कॉमर्स कॉलेजला चषक देऊन गौरवताना प्रा. बिपिन माने. सोबत प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम सोबत मान्यवर

प्रत्युत्तरादाखल खेळलेल्या महावीर कॉलेजची सुरुवात खराब झाली. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना या संघाचे पहिल्या ६ षटकातच दोन महत्त्वाचे फलंदाज बाद झाले. त्याचा अन्य फलंदाजांवर काहीसा दबाव आला. परंतू तरीही संयमाने फलंदाजी करत अभिनंदन गायकवाडने आणि श्रेयस चव्हाण यांनी अर्धशतकी भागिदारी केली. यानंतर मात्र अभिनंदन हा ६७ आणि श्रेयस हा २१ धावांवर बाद झाला. अन्य फलंदाजही लवकरच बाद होत गेले. परिणामी महावीर कॉलेजचा डाव २० षटकात १४४ धावातच गडगडला. त्यामुळे या संघावर कॉमर्स कॉलेजचा ५८ धावांनी विजय होऊन स्पर्धेच्या अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब झाला.

फलंदाजीप्रमाणे गोलंदाजीतही चमकलेल्या क्षितिज पाटीलने महावीर कॉलेजचे ३ खंदे फलंदाज बाद करत कॉमर्स कॉलेजचा सामन्यातील विजय सोपा केला. हर्षवर्धन साळुंखे ३ आणि आदित्य बरालेनेही २ बळी घेत सामना विजयावर शिक्कामोर्तब केला. बक्षीस वितरण समारंभात प्रा. बिपिन माने, प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम यांच्या हस्ते स्पर्धा विजेत्या कॉमर्स कॉलेजच्या संघाला शिवाजी विद्यापीठाचा 'लिंग्रज चषक' देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठ स्पर्धा निरीक्षक प्रा. हर्षकुमार पाचोरे, प्रा. विनायक खोत, प्रा. विजय कांबळे, चंद्रकांत कासोटे यांच्यासह शिवाजी विद्यापीठ संघ निवड समिती सदस्य उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. श्रीनिवास पाटील, प्रा. संग्राम तोडकर यांनी परीश्रम घेतले.

### वालचंद कॉलेज तिसऱ्या स्थानावर

स्पर्धेच्या तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात सांगलीतील वालचंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूरमधील आरआयटी इंजिनिअरिंग कॉलेजचा ७ गडी राखून पराभव केला. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना आरआयटी कॉलेजने २० षटकात ९ बाद ११७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना वालचंद कॉलेजने १४.२ षटकातच ३ बाद ११८ धावा ठोकत सामन्यात विजय मिळवून तिसरा क्रमांक मिळवला. बक्षीस वितरण समारंभात वालचंद कॉलेजलाही चषक देऊन सन्मानित केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2026 सकाळ

# नदी हाच माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू

## मनोज बोरगावकर : विद्यापीठात 'लेखक मुक्तसंवाद' कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : 'निसर्ग वाचणं हीच एक अद्‌भूत गोष्ट असते. तो आनंद अपूर्व असतो. यासाठी मात्र लेखकाने इमान शाबूत ठेवायला हवे. निसर्गाशी नाते जोडायला हवे. यातूनच मी नदीशी जोडला गेलो. नदी हा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे', असे प्रतिपादन 'नदीष्ट' या कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित 'लेखक मुक्तसंवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. बोरगावकर म्हणाले, 'नदी हे आईचे रूप आहे. त्यामुळे नदी वाहती राहिली पाहिजे. मी जे केलं ते अंत:करणातून. गोदामायने व तिथल्या निसर्गाने मला लिहिण्याची प्रेरणा दिली. माझ्या कादंबरीतील घटना या प्रत्यक्ष जीवनाशी निगडित आहेत. सगुणा ही या कादंबरीचा कणा आहे. स्त्री, आई, कविता आणि नदी ही मला एकसारखीच वाटते. यामुळेच नदी माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला. त्यामुळेच जीवनातील एक कवडसा शोधता आला.'


मनोज बोरगावकर

डॉ. शिंदे म्हणाले, 'नदीष्ट' मध्ये मातृत्वाचे एक रूप आणि दुसरे जीवनाचे रूपक आढळते. यातून मानवाचा प्रवास ध्यानात येतो. ही कादंबरी पर्यावरण, सामजिक जाणीव आणि मानवी सहसंबंधांचा शोध घेते. कादंबरी लेखकाची विज्ञानविषयक निरीक्षणे ही वाखाणण्यासारखी आहेत. ही कादंबरी वाचकांचे वाचनभान समृद्ध करणारी आहे.'

यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, कृष्णा दिवटे, सुषमा शितोळे, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. केदार मारुलकर, प्रा. जयसिंग सावंत, अनिल साबळे उपस्थित होते. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

10 JAN 2026

पुढारी

# अणुऊर्जा विभागातील रोजगार संधींबाबत 'डीएई आऊटरीच प्रोग्राम-२०२६'चे आयोजन

**कोल्हापूर :** भारत सरकारच्या अणुऊर्जा विभाग (डीएई) मधील करिअरच्या संधी व भाभा अणुसंशोधन केंद्र (बीएआरसी) द्वारे होणाऱ्या भरती प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी सोमवार, दि. १२ रोजी राजर्षी शाहू सभागृहात दुपारी तीन वाजता 'डीएई आऊटरीच प्रोग्राम-२०२६'चे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र अधिविभाग व अणुऊर्जा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये बीएआरसीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि अभियंते उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पूर्वनोंदणी करावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

10 JAN 2026

सकाळ

# विद्यापीठ रसायनशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ. संजय चव्हाण



डॉ. संजय चव्हाण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाच्या प्रमुखपदी वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय चव्हाण यांची नियुक्ती झाली. त्यांना याबाबतचे पत्र प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आज प्रदान केले. पात्र असूनही मला विभागप्रमुखपदाच्या पदोन्नतीमध्ये डावलले होते. त्यामुळे याबाबत एस. सी. कमिशनकडे मी तक्रार नोंदविली. त्याविरोधात विद्यापीठ प्रशासन उच्च न्यायालयात गेले. त्यात माझ्या बाजूने निकाल लागला. त्यानुसार प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी आज मला विभागप्रमुखपदी नियुक्तीचे पत्र दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2026

पुढारी

# हिंदी गीत, गजलांमुळे सामाजिक ऐक्याची भावना दृढ

## माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी; 'विवेकानंद'मध्ये महाराष्ट्र हिंदी परिषद अधिवेशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हिंदी गीत आणि गजल परंपरेमध्ये अनेक गजलकारांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. हिंदी गीत व गजल सामाजिक समस्यांचे चित्रण करते. त्याचबरोबर समाजातील भेदभाव, अन्याय, अत्याचाराचे चित्रणसुद्धा हिंदी गीत व गजलांमधून येते. दुष्यंतकुमार, डॉ. जहिर कुरेशी आदी गजलकारांनी खऱ्या अर्थाने गजल समाजापर्यंत पोहोचवून गजलेमध्ये सामाजिकता आणली. हिंदी गीत आणि गजलांनी सामाजिक ऐक्याची भावना समाजामध्ये दृढ केली आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष व महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'हिंदी गीत और गजल विविध परिदृश्य' विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र हिंदी परिषदेचे ३२ व्या अधिवेशन उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागातील माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. चंद्रदेव कवडे होते. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. वसंत मोरे, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. मधुकर खराटे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित महाराष्ट्र हिंदी परिषदेचे ३२ व्या अधिवेशन उद्घाटनप्रसंगी बोलताना माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी. समवेत प्रो. डॉ. चंद्रदेव कवडे, डॉ. वसंत मोरे, डॉ. मधुकर खराटे आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

चर्चासत्राचे बीजभाषक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. गजानन चव्हाण यांनी हिंदी गीत आणि गजल या विषयावर मार्गदर्शन केले. चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात हिंदी गीत और गजल सामाजिक परिदृश्य या विषयावर डॉ. पंढरीनाथ पाटील, डॉ. देवीदास बामणे, डॉ. नाजिम शेख यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात हिंदी गीत और गजल : राजनीतिक एवं आर्थिक परिदृश्य या विषयावर डॉ. भाऊसाहेब नवले, डॉ. सुरेश शेळके, डॉ. विठ्ठलसिंह ढाकरे यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात रसिक श्रोत्यांसाठी 'जश्न ए महफिल' हा गजल गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी स्वागत केले. प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. नीलेश जाधव यांनी सूत्रसंचालन केले. सहसमन्वयक डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

1 0 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगीत, नाट्यशास्त्र अधिविभाग सलग चौथ्यांदा विजेता

## 'शिवस्पंदन 'मध्ये विविध कलांचे सादरीकरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात सलग चौथ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते शिवस्पंदन महोत्सवाचे पारितोषिक वितरण झाले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी शोभायात्रेसह सुगम गायन, स्थळचित्रण, एकल नृत्य, भारतीय समूहगीत, मूकनाट्य आणि लघुपट या प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवत सर्वसाधारण विजेतेपदावर सलग चौथ्यांदा आपले नाव कोरले.

अखेरच्या दिवशी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात एकल नृत्य आणि समूहनृत्य स्पर्धा झाल्या. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या समारंभाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मोठा जल्लोषी प्रतिसाद लाभला. पारितोषिक वितरणावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, महोत्सव समन्वयक डॉ. प्रल्हाद माने, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. कविता वड्राळे, डॉ. प्रमोद कसबे डॉ. मीना पोतदार, डॉ. सुरेखा आडके, विजय इंगवले, विशाल म्हातुगडे, अभिषेक कॅबळीकर, प्रियांका पांडव, अंकिता चव्हाण, मॉंटी मिसाळ आदी उपस्थित होते.

स्पर्धेचा अंतिम निकाल अनुक्रमे असा, **शोभायात्रा :**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'शिवस्पंदन' सांस्कृतिक महोत्सव स्पर्धेमध्ये सलग चौथ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करणाऱ्या चमूला विजेतेपदाचा चषक प्रदान करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत मान्यवर.

संगीत व नाट्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, गणित, एम.बी.ए युनिट (वाणिज्य व व्यवस्थापन).

**एकल लोकवाद्य वादन :** प्रतीक जाधव (संगणकशास्त्र), रेहान पठाण, गुरुनाथ ढोले (दोघेही संगीत व नाट्यशास्त्र), सोहन सुतार (वनस्पतीशास्त्र), सुप्रिया गुरव (समाजशास्त्र).

**सुगम गायन :** प्रथमेश पाटील, स्वप्नील कोकळे (दोघेही संगीत व नाट्यशास्त्र), मृण्मयी पांचाळ (मराठी), वैभव माळी (रसायनशास्त्र), विशाल कुंभार (पर्यावरणशास्त्र).

**नकला :** प्रेम पवेकर (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुलर डेव्हलपमेंट), सोहन सुतार (वनस्पतीशास्त्र), आसावरी लोहार (संगीत व नाट्यशास्त्र), अंजली मायने, ऋतुजा जांभळे (दोघेही स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी).

**रांगोळी :** मृण्मयी पांचाळ (मराठी), कुलदीप जठार, सोनल खडकीकर (दोघेही संगीत व नाट्यशास्त्र), मोनिका नलवडे (एम.बी.ए युनिट), अंकिता घोडके (गणित).

**स्थळचित्र :** धोंडी ढवळे, श्रद्धा चराटकर (दोघेही संगीत व नाट्यशास्त्र), रमजान मुल्ला (हिंदी), अजित कुलकर्णी, विराज सुर्वे (दोघेही एम.बी.ए. युनिट).

**एकल नृत्य :** श्रद्धा शुक्ला (संगीत व नाट्यशास्त्र), अनुराधा कांबळे (संगणकशास्त्र), नेहा शिंदे (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुलर डेव्हलपमेंट), निधी सावर्डेकर (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), प्रणय पाटील (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट).

**समूहगीत :** संगीत व नाट्यशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित, राज्यशास्त्र.

**लघुनाटिका :** गणित, पर्यावरणशास्त्र, एम.बी.ए. युनिट, अर्थशास्त्र, संगीत व नाट्यशास्त्र.

**मूकनाट्य :** संगीत व नाट्यशास्त्र, भूगोल.

**लघुपट :** संगीत व नाट्यशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, हिंदी.

**समूहनृत्य :** संगीत व नाट्यशास्त्र, शिक्षणशास्त्र, अर्थशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, भूगोल

**कथालेखन स्पर्धा (मराठी) :** विमल मोरे (मराठी), अनिकेत कांबळे (इंग्रजी), उज्ज्वला कांबळे (वाणिज्य व व्यवस्थापन), निरंजन घुगे (रसायनशास्त्र), सौरभ कापसे (समाजशास्त्र). **कथा लेखन स्पर्धा (हिंदी) :** आदित्य सोनावणे (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), अविनाश कांबळे (हिंदी), प्रतीक्षा पाटील (संगीत व नाट्यशास्त्र), गुलामगौस तांबोळी (हिंदी), उज्ज्वला कांबळे (वाणिज्य व व्यवस्थापन). **कथा लेखन स्पर्धा (इंग्रजी) :** विश्वजित पाटील (संगणकशास्त्र), प्रतीक्षा पाटील (संगीत व नाट्यशास्त्र), प्रेम पवेकर (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), आदित्य सोनावणे, श्रीधर निंबाळकर (दोघेही स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी).

**कविता लेखन स्पर्धा (मराठी) :** अनिकेत कांबळे (इंग्रजी), यश कवडे (राज्यशास्त्र), निरंजन घुगे (रसायनशास्त्र), मोसिम पठाण (राज्यशास्त्र) प्रिया हळदणकर (समाजशास्त्र). **कविता लेखन स्पर्धा (हिंदी) :** विनय जंगम, गुलामगौस तांबोळी, अविनाश कांबळे, श्रद्धा लोंढे (सर्व हिंदी विभाग), उज्ज्वला कांबळे (वाणिज्य व व्यवस्थापन). **कविता लेखन स्पर्धा (इंग्रजी) :** अनिकेत कांबळे (इंग्रजी), नेहा शिंदे (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), प्रतीक्षा पाटील (संगीत व नाट्यशास्त्र), श्रीधर निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी), साक्षी इंजर (राज्यशास्त्र).

**नाट्य लेखन स्पर्धा (मराठी) :** ऋतुजा वडवे (संगीत व नाट्यशास्त्र), श्रीधर निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), साक्षी इंजर (राज्यशास्त्र), आदित्य सोनावणे (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), आनंद निळे (संगीत व नाट्यशास्त्र). **नाट्य लेखन स्पर्धा (हिंदी) :** अविनाश कांबळे, स्वप्नाली धुलुगडे (दोघे हिंदी), श्रीधर निंबाळकर, आदित्य सोनावणे (दोघे स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), गुलामगौस तांबोळी (हिंदी). **नाट्य लेखन स्पर्धा (इंग्रजी) :** नेहा शिंदे (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), सत्यम देवकुळे (इंग्रजी), ओंकार भोसले (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), प्रेम पवेकर (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), श्रीधर निंबाळकर (स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी).

10 JAN 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नदी हाच लेखनाचा केंद्रबिंदू : बोरगावकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नदी हाच माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन 'नदीष्ट' चे लेखक मनोज बोरगावकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित 'लेखक मुक्तसंवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. बोरगावकर म्हणाले, निसर्ग वाचणं हीच एक अद्‌भुत गोष्ट असते. तो आनंद अपूर्व असतो. यासाठी मात्र लेखकाने इमान शाबूत ठेवायला हवे. निसर्गाशी नाते जोडायला हवे. यातूनच मी नदीशी जोडला गेलो. नदी हे आईचे रूप आहे. त्यामुळे नदी वाहती राहिली पाहिजे. मी जे केलं ते अंतःकरणातून गोदामायने व तिथल्या निसर्गाने मला लिहिण्याची प्रेरणा दिली. अध्यक्षीय मनोगतात डॉ. शिंदे म्हणाले, 'नदीष्ट'मध्ये मातृत्वाचे एक रूप व दुसरे जीवनाचे रूपक आढळते. यातून मानवाचा प्रवास ध्यानात येतो. ही कादंबरी पर्यावरण, सामजिक जाणीव आणि मानवी सहसंबंधांचा शोध घेते. कादंबरी लेखकाची विज्ञानविषयक निरीक्षणे ही वाखाणण्यासारखी आहेत. ही कादंबरी वाचकांचे वाचनभान समृद्ध करणारी आहे. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रांजली क्षीरसागर यांनी केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, कृष्णा दिवटे, सुषमा शितोळे, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. केदार मारुलकर, प्रा. जयसिंग सावंत, अनिल साबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 JAN 2026
सकाळ

# 'संगीत-नाट्यशास्त्र' सलग चौथ्यांदा 'शिवस्पंदन'चे विजेते

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात सलग चौथ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवित संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने उत्कृष्ट कामगिरी नोंदविली. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते गुरुवारी (ता. ८) शिवस्पंदन महोत्सवाचे पारितोषिक वितरण झाले.**

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी शोभायात्रेसह सुगम गायन, स्थळचित्रण, एकल नृत्य, भारतीय समूहगीत, मूकनाट्य आणि लघुपट या प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवित सर्वसाधारण विजेतेपदावर सलग चौथ्यांदा आपले नाव कोरले. शोभायात्रा स्पर्धेत संगीत व नाट्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, गणित, एम.बी.ए युनिट (वाणिज्य व व्यवस्थापन) यांनी यश मिळविले. अन्य स्पर्धांमध्ये संगीत व नाट्यशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित, राज्यशास्त्र (समूहगीत), संगीत व नाट्यशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, गणित, राज्यशास्त्र (भारतीय समूहगीत), गणित, पर्यावरणशास्त्र, एम.बी.ए. युनिट, अर्थशास्त्र, संगीत व नाट्यशास्त्र (लघुनाटिका), संगीत व नाट्यशास्त्र, भूगोल (मूकनाट्य), संगीत व नाट्यशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँण्ड बायोटेक्नॉलॉजी, स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी, हिंदी (लघुपट), संगीत व नाट्यशास्त्र, शिक्षणशास्त्र, अर्थशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, भूगोल (समूहनृत्य) विजेते ठरले.

महोत्सवात काल अखेरच्या दिवशी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात एकल नृत्य आणि समूहनृत्य स्पर्धा पार पडल्या. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, महोत्सव समन्वयक डॉ. प्रल्हाद माने, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, कविता वड्राळे, प्रमोद कसबे, मीना पोतदार, सुरेखा आडके आदी उपस्थित होते. के. एस. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मतदार जागृतीविषयक पथनाट्य सादर केले.

### स्पर्धेतील विजेते...

या महोत्सवात एकल लोकवाद्य वादन, सुगम गायन, नकला, रांगोळी, स्थळचित्र आदी स्पर्धा झाल्या. त्यातील विजेत्यांमध्ये प्रतीक जाधव, रेहान पठाण, गुरुनाथ ढोले, मोहन सुतार, सुप्रिया गुरव, प्रथमेश पाटील, स्वप्नील कोकळे, मृण्मयी पांचाळ, वैभव माळी, विशाल कुंभार, प्रेम पवेकर, सोहन सुतार, आसावरी लोहार, अंजली मायने, ऋतुजा जांभळे, मृण्मयी पांचाळ, कुलदीप जठार, सोनल खडकीकर, मोनिका नलवडे, अंकिता घोडके, धोंडी ढवळे, श्रद्धा चराटकर, रमजान मुल्ला, अजित कुलकर्णी, विराज सुर्वे, शुक्ला शशिकुमार, अनुराधा कांबळे, नेहा शिंदे, निधी सावर्डेकर, प्रणय पाटील, विमल मोरे, अनिकेत कांबळे, उज्ज्वला कांबळे, निरंजन घुगे, सौरभ कापसे, अविनाश कांबळे, प्रतीक्षा पाटील, गुलामगौस तांबोळी, विश्वजित पाटील, आदित्य सोनावणे, श्रीधर निंबाळकर, यश कवडे, निरंजन घुगे, मोसिम पठाण, प्रिया हळदणकर, विनय जंगम, अविनाश कांबळे, श्रद्धा लोंढे, साक्षी इंजर, ऋतुजा बडवे, आनंद निळे, स्वप्नाली धुलुगडे, सत्यम देवकुळे, ओंकार भोसले यांचा समावेश आहे.



कोल्हापूर : 'शिवस्पंदन'सांस्कृतिक महोत्सव स्पर्धेमध्ये सलग चौथ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करणाऱ्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या चमूला करंडक प्रदान करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. यावेळी शेजारी डॉ. व्ही. एन. शिंदे, तानाजी चौगुले, प्रल्हाद माने, विनोद ठाकूरदेसाई आदी उपस्थित होते.

10 JAN 2026 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंग्रजी संभाषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी अवांतर वाचन महत्त्वाचे

## प्राचार्य डॉ. नागेश नलवडे; नाईट कॉलेजमध्ये एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

इंग्रजी संभाषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी अवांतर इंग्रजी वाचन, बोलण्याचा सराव, आत्मविश्वास व सातत्य यास महत्त्व आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नागेश नलवडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत नाईट कॉलेज येथे इंग्रजी विभागामार्फत 'इंग्लिश कम्युनिकेशन स्किल्स एंड करिअर ऑपॉर्च्युनिटीज' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत बोलत होते. कार्यशाळेचे उद्‌घाटन कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेचे बीजभाषक म्हणून डॉ. नलवडे यांनी श्रवण, भाषण, वाचन व लेखन या भाषिक कौशल्यांवर प्रभुत्व कसे मिळवावे हे विविध उदाहरणाद्वारे सांगितले.



**कोल्हापूर : नाईट कॉलेज येथे इंग्रजी विभागामार्फत आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ. नागेश नलवडे. समवेत डॉ. विश्वनाथ मगदूम, प्राचार्य प्रा. डॉ. उत्तम पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

प्रथम सत्रामध्ये पौर्णिमा पाटील यांनी 'व्हाय युक्र डिग्री इझंट इनफ विदाऊट इंग्लिश' या विषयावर संवाद साधला. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ. सबीहा फरास यांनी टर्निंग ब्रोकन इंग्लिश इंटू करियर इंग्लिश' या विषयावर चर्चा केली. कार्यशाळेसाठी न्यू कॉलेज क्लस्टर अंतर्गत विविध महाविद्यालयांतील १५९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेच्या नियोजनामध्ये प्राचार्य प्रा. डॉ. उत्तम पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.